**कै.विमलबाई गंगाधर गायकवाड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे**

**# उद्देश मानके आणि ध्येय. #**

- कै.विमलबाई गंगाधर गायकवाड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची स्थापना ज्ञानदानासारखे पवित्र कार्य करण्यासाठी केलेली आहे.
- गायकवाड जळगाव या परिसरामध्ये आजही आपण जेंव्हा दळण-वळणांच्या साधनांनी समृद्ध झालेलो असलो तरी सुद्धा येथे एस.टी. महामंडळाची बस आजही पोहोचलेली नाही. शालेय मुलामुलींच्या शिक्षणाची गैरसोय होऊ नये किंवा ज्ञानापासून हि पिढी वंचित राहू नये म्हणून सदर गावासोबत जोडलेली नाळ कायम ठेवण्यासाठी या गावामध्ये कै.विमलबाई गंगाधर गायकवाड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय सुरु केले आहे.
- सदर विद्यालयाचा मूळ उद्देश व हेतू ज्ञानदान आणि पिढी घडविणे हा एकमेव आहे.
- चांगल्या आरोग्यासाठी ऑक्सिजन,मानसिक संतुलनासाठी निसर्गाची साथ आणि आत्मिक बळासाठी नैसर्गिक वातावरणाची गरज असल्यामुळे विद्यालयाचा संपूर्ण परिसर हा हिरवाईने नटलेला आहे.
- सध्याच्या काळातील समाजामध्ये गतीने अनेक बदल होत आहे, याबदलांसोबत सदर विद्यालयामध्ये कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून विद्यालयाने सी.सी.टी.वी. कॅमेरे कार्यान्वित आहेत.
- विद्यालयातील प्रत्येक पाल्य हि आमची जबाबदारी असल्यामुळे आपत्कालीन व्यवस्थापनाच्या दृष्टीने अग्निशमन यंत्रणा शालेय इमारतीमध्ये उपलब्ध आहे,तसेच शालेय इमारत हि सुटसुटीत आणि मोकळी आहे.
- ज्ञानासाठी गुरूंची महत्वाची भूमिका आहे आणि म्हणून सदर विद्यालयामध्ये प्रशिक्षित उच्चशिक्षित शिक्षकवर्ग आहे.

- ❖ शालेय विद्यार्थांच्या सर्वांगीण हिताच्या दृष्टीने म्हणजेच सामाजिक,आर्थिक,नैतिक,आत्मिक विकासाच्या दृष्टीने तसेच सुदृढ जडण-घडणाच्या दृष्टीने सर्व सुविधायुक्त अशी सुसज्ज प्रयोगशाळा, ग्रंथालय,नियमित परिपाठ,संगणक कक्ष,प्रोजेक्टर कक्ष अद्यावत विद्यालयामध्ये उपलब्ध आहे.
- ❖ जागतिक,तसेच राष्ट्रीय स्तरावर खेळाडू तयार होण्याच्या दृष्टीने प्रशस्त असे खेळाचे मैदान उपलब्ध आहे.
- ❖ शालेय मुलामुलीकरिता व शिक्षकांसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची व्यवस्था केलेली आहे.सदर स्वच्छता गृहामध्ये आवश्यक असलेल्या सर्व सुविधा उपलब्ध आहे.
- ❖ शासन मान्यता प्राप्त शालेय पोषण आहार नियमित दिला जातो,सदर शालेय पोषण आहारासाठी शासनाच्या अनुदानाची वाट न पाहता किंवा त्यावर अवलंबून न राहता शिक्षक स्वतः आपले पाल्य समजून ही व्यवस्था करतात.
- ❖ शालेय पोषण आहारासाठी स्वयंपाकी आणि मदतनीस यांची नेमणूक केलेली आहे आणि त्यांचे मानधन शासनाच्या DBT योजनेद्वारे होते.
- ❖ गुणवत्ता शिष्यवृती, सुवर्णमहोत्सवी शिष्यवृती, सावित्रीबाई फुले शिष्यवृती, ८ वी ते १० वी मागासवर्गीय शिष्यवृती, (NMMS) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृती. या सर्व योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना शासनामार्फत DBT योजनेद्वारे दिला जातो.
- ❖ आमच्या विद्यालयामध्ये मुलांना विज्ञानाची गोडी निर्माण होण्यासाठी तसेच त्यांच्यामध्ये असलेल्या संशोधक वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी Inspire Award मध्ये मुलांचा सहभाग घेतला जातो.
- ❖ सर्व प्रकारचे शालेय कामकाज सुरळीत चालण्यासाठी विद्यालयात शालेय व्यवस्थापन समितीची स्थापना केलेली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी नियमित बैठका घेतल्या जातात.
- ❖ सदर विद्यालयामध्ये शिक्षक-पालक संघाची स्थापना केलेली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी नियमित बैठका घेतल्या जातात.

- ❖ विद्यालयामध्ये नियमित पालक सभा आयोजित केली जाते व पालकांचे प्रश्न विचारात घेऊन त्यांचे निरसन केले जाते.
- ❖ विद्यालयामध्ये महिला शिक्षिका आहे आणि शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थिनी शाळेत येतात. सदर महिला शिक्षिका व मुलीना संरक्षण, आत्मविश्वास आणि आरोग्यदायी, आनंददायी वातावरण देणे हे विद्यालयाचे उद्दिष्ट आहे आणि म्हणून विद्यालयामध्ये महिला तक्रार निवारण समितीची ( विशाखा समिती ) स्थापना केलेली आहे.
- ❖ विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांचे विविध प्रकारचे खेळ घेतले जातात व त्यासाठी तज्ञ प्रशिक्षकाची नेमणूक केलेली आहे.
- ❖ योग ज्यामुळे आरोग्य तसेच वैचारिक शक्तीस चालना मिळते, त्यामुळे योग शिबिराचे नियमित आयोजन केले जाते.
- ❖ नियमितपणे विद्यार्थांचे आरोग्य शिबीर आयोजित केले जाते.
- ❖ शासनामार्फत विविध शासकीय योजना राबविल्या जातात ज्या शालेय विद्यार्थांशी संबधित असतात त्यांची माहिती त्यांना देण्यात येते.
- ❖ विद्यालयामध्ये वर्षभरामध्ये विविध शेत्रातील नामांकित आणि तज्ञ व्यक्तींना आमंत्रित करून त्यांचे अनुभव आणि व्याखानाचे आयोजन केले जातात.
- ❖ विद्यालयाचा २००२ ते २०२३ पर्यंतचा निकाल हा सरासरी ९५ टक्क्याहू न अधिक आहे. सदर विद्यालयाचा निकाल हा प्रतिवर्षी १०० टक्के पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट विद्यालयाने ठेवलेले आहे.
- ❖ सदर विद्यालयामध्ये शासनाच्या आलेल्या निधीचा वापर किंवा अनुदान हे सर्व काही संगणक प्रणालीमार्फत शासनाच्या वेबसाईटवर आलेले आहे.
- ❖ पारदर्शक आणि कायद्याला बांधील आमच्या विद्यालयाची संपूर्ण माहिती संगणक प्रणाली मार्फत नेटवर्कला जोडलेली आहे.
- ❖ माध्यमिक शाळा संहिता प्रमाणे व वेळोवेळी शिक्षणाधिकारी, गट शिक्षणाधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी , केंद्रप्रमुख यांच्याकडून मिळालेल्या सुचनेप्रमाणे / नियमाप्रमाणे विद्यालय चालवले जाते.